Date ____
Page ____

# शिवकालीन न्यायव्यवस्था

## * प्रास्ताविक :

शिवाजीने आपल्या कारकीर्दीची सुरुवात आदिलशाहीचा एक जहागिरदार म्हणून केली होती. त्यामुळे सुरुवातीच्या काळात मुस्लिम राजवटीतील कायदेकानून व पद्धतीचाच त्यांनी अवलंब केल्याचे दिसते. डॉ.व्ही.टी. गुणे म्हणतात "सर्व मुस्लिम न्यायालयीन संस्था मराठे काळात थोड्याफार फरकाने अस्तित्वात असलेल्या दिसतात." सन १६५० पासून शिवाजीच्या कारकीर्दीला हळूहळू विशिष्ट वजन प्राप्त झाले. स्वराज्यातील प्रदेशात वाढ झाल्यानंतर व तुलनेने शांतता लाभल्यानंतर त्याने जुन्या धर्मग्रंथावर आधारित अशी न्यायव्यवस्था आपल्या स्वराज्यात लागू केली. शिवाजीच्या न्यायव्यवस्थेमध्ये जरी काही नवीन पद्धती असल्या तरी जुन्या न्यायव्यवस्था काही परंपरा तशाच अस्तित्वात होत्या. शिवाजीची न्यायव्यवस्था पुढील प्रमाणे होती.

केंद्रीय न्यायव्यवस्था : शिवाजीच्या केंद्रीय न्यायव्यवस्थेत राजा, राजमंडळ, हुजूर मजलीस व गोतसभा किंवा गोतमजलीस या न्यायालयीन संस्था न्यायदानाचे कार्य करीत असत.

१) राजा : शिवकाळात राजा हाच सर्व न्यायव्यवस्थेचा प्रमुख असे. राजाच्या मदतीला राजमंडळ, ब्राह्मसभा या दोन महत्वाच्या सभा असत. परंतु राजा हा सर्व राज्याचा प्रमुख असल्याने तोच सर्व न्यायव्यवस्थेचा प्रमुख समजला जात असे. राजा शिवाजी रायगडावर बसून न्यायदानाचे व अपिल ऐकण्याचे काम करीत असे. राजाला त्याच्या कामात मदत करण्यासाठी राजमंडळ असे. या राजमंडळात अष्टप्रधान मंडळ, खाजगी सचिव, त्यांच्या हाताखाली काम करणारे दुय्यम मुतालिक इत्यादी लोक असत. काही वेळा विद्वान लोकांना राजमंडळात सामील करून घेतले जात असे. अशा लोकांना सभासद असे म्हटले जाई. राजमंडळातील या सर्व सभासदांची नेमणूक स्वतः छत्रपती करीत असे. अशा लोकांना सभासद म्हणत. हे सर्व सभासद

Scanned by CamScanner

छत्रपतीला जबाबदार असत आणि छत्रपतीची मर्जी असेपर्यंतच ते राजमंडळात राहू शकत. सन १६७४ मध्ये हे राजमंडळ अधिकृतपणे अस्तित्वात आले. हिंदू धर्मशास्त्रानुसार राजा हाच न्यायखात्याचा प्रमुख झाला. न्यायाधीश व पंडितराव हे दोन मंत्री स्वतंत्रपणे न्यायदानाचे कामकाज पाहू लागले.

केंद्रीय न्यायालयाचे कामकाज दोन पद्धतीने चालत असे त्यातील पहिली पद्धत म्हणजे स्वतः राजा हा मंत्र्याच्या मदतीने निकाल देत असे त्याला, 'राजमुद्रा' असे म्हणत. व ज्यावेळी एखाद्या दरबारात उघडपणे खटल्याचे कामकाज चालत असे तेव्हा त्याला 'धर्मसभा' किंवा 'हुजूर मजलिसा' असे म्हणत. याज्ञवल्क्य स्मृतीला अनुसरून राजाने सल्लागाराशिवाय न्यायनिवाडा करू नये, हे तत्व मात्र शिवाजीने काटेकोरपणे पाळले. ज्या ज्या खटल्यामध्ये स्थानिक स्वरूपाचा प्रश्न समाविष्ट होत असे त्या वेळी मजलिस किंवा गोतसभेचा सल्ला शिवाजी घेत असे.

फौजदारी स्वरूपाचे खटले मात्र स्वतः शिवाजी चालवित असे. तसेच वतनासंबंधीचे खटलेही शिवाजी स्वतः चालवित असे. अशा वेळी राजा सर्व पुरावे पाहत असे. फिर्यादीला आपली बाजू मांडण्याची संधी दिली जात असे. जर एखादवेळी शिवाजी मोहिमेवर जाण्याच्या तयारीत असेल आणि अशावेळी काही तक्रारी आल्या तर अशा तक्रारींचा निर्णय पुढे ढकलला जात असे व मोहिमेवरून परत आल्यावर निर्णय दिला जात असे.

2) न्यायाधीश व पंडितराव :

शिवकालीन केंद्रीय न्यायव्यवस्थेतील राजाच्या खालो-खालचे अधिकारी म्हणजे न्यायाधीश व पंडितराव हे होत. हे दोन मंत्री राजाने नेमलेले असत व इतर मंत्र्यांप्रमाणे तेही कामकाज करीत असत. न्यायाधीशाने इतर प्रचलित असलेल्या कायद्यांचा विचार करून निकाल द्यावा असे त्याच्यावर बंधन असे. तसेच त्याने धर्मशास्त्राला अनुसरून निकाल करावा, त्याच्या निकालावर राजाची संमतीदर्शक सही असावी. न्यायाधीशाची अधिकारकक्षा राज्यातील सर्व खटल्यावर चालत असे.

Scanned by CamScanner

न्यायाधिशाच्या जोडीला पंडितराव हा एक दुसरा न्यायाधीश असे. पंडितरावाकडे फक्त धार्मिक स्वरूपाचे खटले उपस्थित केले जात असे. देवस्थानांना दिलेल्या इनामाबद्दल जर काही खटले निर्माण झाले तर खटले पंडितराव धर्मशास्त्राच्या आधारे चालवित असे.

काही खटले शिवाजी, न्यायाधीश व पंडितराव यांच्या कडेच चालविण्यास देत असे. न्यायाधीश व पंडितराव हे चांगले ज्ञानी असावेत किंवा त्यांना कायद्याचे चांगले ज्ञान असावे. याबद्दल शिवाजी दक्ष असे. या दोघांच्या जागी साधारणपणे ब्राम्हण कुटुंबातील व्यक्तीची निवड केली जात असे. अशा व्यक्ती-ची निवड करताना बुद्धिमत्ता, प्रामाणिकपणा, निःपक्षपातीपणा, हिंदू कायद्यांचे व रूढींचे ज्ञान असणे आवश्यक मानले जात असत. परमानंद म्हणतो. शिवाजीला न्यायाधिशाबद्दल फार आदर वाटत असे. न्यायलयात न्यायाधिशाला बसण्यासाठी उच्च आसन दिले जात असे. शिवकाळात न्यायाधिशाला वार्षिक ३००० होन पगार होता.

* राजमंडळ किंवा राजसभा :

शिवकालीन राजमंडळात राजा, त्याचे मंत्री आणि उच्च अधिकारी असत, या उच्च अधिकाऱ्यात सुभेदार, हवालदार, मुजुमदार, सरनोबत हे सरकारी अधिकारी आणि देशमुख, देशपांडे पाटील, कुळकर्णी व ज्या भागातील खटला असेल त्या भागातील शेटे महाजन हे वतनी अधिकारी असत. राजमंडळातील या सभासदांचे न्यायालय भरल्यानंतर राजाला संबधित खटल्याची माहिती देणे व न्यायाच्या बाबतीत राजाला सल्ला देणे हे काम या राजसभेला करावे लागत असे. तसेच राजाने निकाल दिल्यानंतर जी 'राजमुद्रा' तयार होत असे त्यावर सही करणे हे राजसभेचे काम असे.

वतनासंबंधीचे खरेदी-विक्रीसंबधीचे व्यवहार व खटले, वतनाचे वारस ठरविणे, वतनासंबंधीची भांडणे या सभेत सोडविली जात. पाटीलकीच्या वतनासंबंधी वाद असेल तर या राजमंडळात फक्त संबंधित प्रांतांच्या सुभेदार, विद्वान ब्राम्हण, मुजुमदार,

देशमुख, देशकुलकर्णी व शेटे यांनाच बोलविले जाई.
गाव मजलिस किंवा गावराजमंडळ, महाल राजमंडळ परगणा राजमंडळ व सुभा राजमंडळ अशा चढत्या श्रेणीने या राजमंडळाचे काम चालत असे. सुभा राजमंडळ किंवा सुभा मजलिसमध्ये सुभेदार न्याय देण्याचे काम करीत असे. परंतु त्याने दिलेल्या निकालावर राजाची संमतीदर्शक सही असल्याशिवाय निकाल अंतिम समजला जात नसे. सुभेदाराला मदत करण्यासाठी देशमुख आणि परगणा गोतसभा असे. काही वेळ गावकीच्या हक्कासंबंधी बलुतेदारामध्ये भांडणे होत असत. अशी भांडणे सोडविण्याचे कामही सुभा मजलिसला करावे लागत. अशा वेळी सुभा मजलीसाची सभा कसब्याच्या ठिकाणी बोलविली जात असे. या सभेला अधिकाऱ्यांबरोबरच त्या गावच्या बलुतेदारांना बोलविले जात असे.

ब) ब्राम्हसभा :
डॉ. व्ही. टी गुणे म्हणतात, "ब्राम्हसभा किंवा धर्मसभा ही ग्राममजलीस किंवा मुस्लिम काळातील परगणा मजलीस यांचेच विकसित रूप होते." शिवकाळातील ब्राम्हसभा ही विद्वान ब्राम्हणांची सभा असते. तिची बैठक, कोल्हापूर, पैठण, पंढरपूर सारख्या तीर्थस्थळी भरत असे. ब्राम्हसभेपुढे सर्व साधारणपणे, सामाजिक व धार्मिक स्वरूपाचे खटले चालविण्यासाठी येत असत. यात पुजाऱ्यांचे मंदिरासंबंधीच्या हक्काचे खटले आणि हिंदु-मुस्लिम धर्मीयांतील खटले. धर्माधिकाऱ्यांच्या वतनासंबधीचे खटले, दोन जाती-जमातीमधील भांडणासंबधीचे खटले यांचा समावेश होत असे. ब्राम्हसभेचे खटले जेव्हा शिवाजीसमोर चालत तेव्हा ब्राम्हसभेची बैठक एखादया तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी भरत असे तेव्हा स्थानिक गोतसभेतील सभासद या बैठकीला हजर असत. अशा वेळी ब्राम्हसभेच्या निर्णयाला गोतसभेकडून मान्यता मिळत असे.
जेव्हा दोन जमातीमधील भांडणांचा निकाल द्यावयाचा असेल त्यावेळी त्या दोन्ही जमातींच्या प्रमुखांना ब्राम्हसभेच्या बैठकांना बोलविले जात असे. उदा. सन १६५६ मध्ये अथनी गावातील लिंगायत व जैन या दोन जमातीमध्ये जैनांनी लिंगायत गुरु जंगम

यांच्यावर टीका केल्याच्या कारणावरुन संघर्ष निर्माण झाला असता जमखंडी येथे ब्राम्हसभेची बैठक बोलविण्यात आली. या बैठकीला या दोन्ही जमातीमधील केलेल्या विनंतीवरुन देसाई, देशकुलकर्णी, पाटील, चौधरी, पठाण, महाजन, शेटे, कुणबी व बलुतेदार यांना न्यायदानासाठी बोलवण्यात आले होते. सर्वांना आपले मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य या सभेने दिले होते.

काही वेळा न्यायदानासाठी काशीच्या विद्वान ब्राम्हणांचाही सल्ला घेतला जात असे. अशा रीतीने धार्मिक खटल्यासंबंधी निर्णय देणारी ब्राम्हसभा शिवकालात एक महत्त्वाची संस्था मानली जात असे.

३) गोतमजलीस :

केंद्रीय न्यायव्यवस्थेतील गोतमजलीसही दिवाणी स्वरूपाचे खटले चालविणारी शिवकालातील महत्वाची संस्था होती. गोतमजलीसमध्ये देशमुख, तक्षीमदार, सरखोत, नाईक, शेटे, पाटील इत्यादी देशक आणि तेली, कुंभार, परीट, महार इत्यादी बलुतेदार हे सभासद असत. देशमुखी कुटुंबातील वतनासंबंधीच्या भांडणांचे निकाल देणे हे गोतमजलीसचे मुख्य काम असे. काही वेळा सुभेदार, काही वेळा राजा तर काही वेळा राजकुटुंबातील व्यक्ती किंवा परगण्याचा हवालदार गोतमजलीसच्या सभेचे कामकाज चालवून निकाल देत असत. निकाल देताना खटल्याशी संबंधित अशी महत्वाची कागदपत्रे व तोंडी पुरावा तपासला जात असे.

सन १६६७ मध्ये बाबाजी देशमुख व मालोजी पतंगराव यांच्या देशमुखी वतनासंबंधीचा निकाल देताना शिवाजीच्या मातोश्री जिजाबाई यांनी गोतमजलीसची सभा बोलावून निकाल दिल्याचा संदर्भ मिळतो.

२) प्रांतिक व स्थानिक न्यायव्यवस्था :

प्रांतिक न्यायव्यवस्थेत शिवकालात मंत्र्यांचे विभाग, सुभा मजलिस, परगणागोत मजलीस, तर्फ किंवा ठाणा मजलीस आणि ग्राम मजलीस या महत्वाच्या संस्था न्यायदानाचे काम करीत होत्या. या संस्थांची रचना, अधिकार व कामे पुढील प्रमाणे आहेत.

Scanned by CamScanner

१) मंत्र्यांचे विभाग :-

शिवाजीने स्थानिक प्रशासनाचे दोन भाग केले होते. त्यापैकी मंत्र्यांच्या ताब्यातील विभाग हा सुसंघटित असे; तर दुसरा विभाग संबंध प्रांतभर इतस्त: पसरलेला असे. पहिल्या सुसंघटित विभागावर मंत्र्यांचे नियंत्रण असे व तेथील कामकाज मंत्री पाहत असत. दुसऱ्या विभागाचे नियंत्रण सुभेदाराकडे असे आणि हा सुभेदार मंत्र्याला प्रशासकीय कामात मदत करीत असेच. परंतु मंत्र्यांना न्यायदानाच्या कामातही मदत करीत असे. मंत्र्यांच्या विभागातील न्यायदानासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही.

२) सुभा मजलीस :

प्रांतीय पातळीवर न्यायदान करणारी शिवकाळातील महत्वाची न्यायसंस्था म्हणजे सुभा मजलीसचा प्रमुख असे. प्रशासकीय कामाबरोबरच सुभेदाराला सुभा मजलीसमध्ये न्यायदानाचे काम करावे लागे. तसेच दिलेल्या निकालाची अंमलबजावणीही त्यालाच करावी लागत असे. शिवकाळात न्यायदानाचे काम व अंमलबजावणीचे काम यांच्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असल्याचे दिसत नाही. लोकांच्या तक्रारी ऐकून न्यायनिवाडा करणे हे सुभेदाराचे मुख्य काम असे. फौजदारी गुन्ह्यासंबंधीचे खटले राजाकडे पाठविले जात असत. मात्र आपल्या प्रांतातील दिवाणी फौजदारी अशा दोन्ही स्वरूपाच्या प्रकरणावर सुभेदाराला देखरेख करावी लागे. काही वेळा दिवाणी दावे परगण्याचे देशमुख सुभेदाराकडे चौकशीसाठी पाठविले जात.

सुभेदार हा सुभामजलीसचा प्रमुख असे. राजाचा प्रतिनिधी म्हणून तो सुभामजलीसमध्ये न्यायदानाचे काम पहात असे. वतनासंबंधीचे खटले चालविणे हे सुभेदाराचे मुख्य काम असे. अशा वेळी सुभेदार स्थानिक गोतसभा, हवालदार व परगण्याचे देशमुख यांची मदत घेत असे. वतनांची खरेदी-विक्री करावयाची असेल तर दोन्ही पक्षांना त्याच्या सही-शिक्क्याची लेखी परवानगी घ्यावी लागत असे. तसेच जमीन महसुलसंबंधीचे दावे निकालात काढण्याचे काम सुभेदाराला करावे लागे.

Scanned by CamScanner

3) परगणा गोतमजलीस :

सुभा गोतमजलीस प्रमाणे परगणा गोतमजलीस ही प्रांत पातळीवर न्यायदानाचे काम करणारी आणखी एक न्यायसंस्था होती. या परगणा गोतमजलीसमध्ये देशमुख, देशपांडे, देसाई, सरदेसाई आणि गावपातळीवरील पाटील, कुलकर्णी, शेटे, महाजन व चौगुला यांचा समावेश होत असे. न्यायदानाचे काम देशमुख व देशपांडे हे करीत असत.

गोतमजलीसचा प्रमुख या नात्याने देशमुखाला दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही स्वरूपाचे खटले चालवावे लागत असत. जमीन महसुलाच्या वसुलीसंबंधीच्या तक्रारी सोडविणे व परगण्यातील मोकादमाविरूद्ध रयतेकडून आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्या निकालात काढण्याचे काम देशमुखाला करावे लागत असे. तसेच परगण्यातील वतनासंबंधीच्या तक्रारी ऐकून घेणे व गोतमजलीसच्या मदतीने त्यांचा निकाल देणे हे कामही देशमुखाला करावे लागे.

वतनांची अदलाबदल करणे किंवा वतनावरील हक्का संबंधीच्या तक्रारींचा निकाल देताना देशमुख संबंधित गावातील प्रमुख रहिवाशांना साक्षीदार म्हणून बोलावित असे, अशा वेळी तो सर्वांना तक्रारींचे स्वरूप सांगीत असे. कागदपत्रांचा पुरावा सादर करीत असे व सर्वांचा सल्ला, सुचना विचारात घेऊन निर्णय देत असे. पाटीलकीच्या किंवा कुलकर्णी वतनासंबंधीचा खटला असेल तर अशावेळी देशमुख परगणा गोतमजलीसच्या सर्व सभासदांना व संबंधित गावच्या प्रतिष्ठित गावकऱ्यांना साक्षीदार म्हणून बोलवित असे.

गोतमजलीसने निवाडापत्र तयार केल्यानंतर त्यावर देशमुखाला सही करावी लागत असे तो आपल्या मुतालिकामार्फत वादी व प्रतिवादी यांच्याकडून न्यायालयीन शुल्क वसूल करीत असे. त्याला परगणा गोतमजलीसने दिलेल्या निकालासंबंधीचा अहवाल राजाला सादर करावा लागत असे. जर एखादेवेळी त्याच्या समोर त्याच्या समोर आलेल्या एखाद्या खटल्यासंबंधीचा निर्णय ग्रामगोतसभेमार्फत लागला पाहिजे असे त्याला वाटले तर तो अशा खटल्यासंबंधीची सर्व कागदपत्रे तयार करून ग्रामसभेकडे पाठवित असे. खुनासारख्या गुन्ह्याच्या संदर्भातील खटल्यात सरकाराचा प्रतिनिधी व गोतमजलीसचा प्रमुख या नात्याने देशमुख महत्वाची भूमिका पार पाडित असे.

४) तर्फ किंवा ठाणा मजलिस :

तर्फे किंवा ठाणा मजलीस मध्ये हवालदार व ठाणा गोतसभा असे दोन भाग असत. यापैकी हवालदार हा निश्चित स्वरूपाच्या पगारावर काम करणारा अधिकारी असला तरी त्याला मजलीसच्या साह्याने न्यायदानाचे काम करावे लागत असे.

ठाणा मजलीसच्या कामकाजावर देखरेख ठेवणे, गावच्या सरहद्दीसंबंधीचे तंटे सोडविणे, इनामी वतना संबंधीच्या तक्रारी दूर करणे हे हवालदाराचे मुख्य काम असे. तालुका किंवा ठाणा मजलीसची सभा बोलावून तिच्या सल्ल्याने तालुका पातळीवर न्यायदान करण्याचे काम हवालदार करीत असे. पोलिस अधिकारी म्हणूनही हवालदार काम करीत असे. अशावेळी त्याला बरेच न्यायालयीन अधिकार प्राप्त होत असत. तालुक्याची शांतता व सुव्यवस्था बिघडविणाऱ्याला शिक्षा करणे, कैद्यावर नजर ठेवून तुरुंगाच्या व्यवस्थेवर देखरेख ठेवणे, ठाणा मजलिसने गुन्हेगारांना केलेला दंड वसूल करणे, थकबाकीदारांना शिक्षा करणे इ. न्यायलयीन कामे हवालदाराला करावी लागत असत.

जेव्हा परगणा मजलीसमोर एखादा खटला उभा रहात असे त्यावेळी हवालदार पंच म्हणून त्याच्या विभागातील गुन्ह्याच्या ठिकाणाला भेट देऊन स्वतः चौकशी करीत असे व चौकशी अहवाल परगणा मजलीस प्रमुख सुभेदार याला सादर करीत असे. एखाद्या घटनेच्या वेळी पंचनामा होत असे त्यावेळी हवालदार सरकारच्या वतीने पंच म्हणून तेथे हजर रहात असे. वादी व प्रतिवादी करू कडून जाब-जबाब होत असताना सरकारी साक्षीदार म्हणून हवालदाराची उपस्थिती आवश्यक मानली जात असे.

५) ग्राम मजलीस :

शिवकाळात ग्राम मजलीस हे स्थानिक न्यायव्यवस्थेतील सर्वात कनिष्ठ न्यायालय होते. ग्राममजलीसमध्ये मुकादम, चौगुला व कुळकर्णी हे अधिकारी महत्वाची भूमिका बजावत असत.

Scanned by CamScanner

मुकादम :

गावचा मुख्य मुकादम अथवा पाटील याच्याकडे शिवकाळात मुलकी व न्यायालयीन असे दोन्ही अधिकार असत. न्यायालयीन क्षेत्रातील मुकादमाचे अधिकार व्यापक होते. गावातील गोतसभेचा तो अध्यक्ष असे. गावातील लोकांच्या वतनासंबंधीच्या तक्रारींचा गोतसभेच्या सहाय्याने निर्णय देण्याचे काम मुकादम करीत असे. दोन गावातील सरहद्दी संबंधीचा तंटाही तो ग्रामगोतसभेच्या सहाय्याने सोडवित असे.

चौगुला :

चौगुला हा ग्राममजलीसमधील एक महत्त्वाचा घटक असे. ग्राममजलीस बटल्याचे कामकाज चालवित असताना गावचा चौगुला त्यावेळी हजर असे व निकालपत्र तयार झाल्यावर त्यावर तो सही करीत असे. चौगुल्या प्रमाणेच मुजुमदारही ग्राममजलीसमध्ये निवाड्याच्या वेळी हजर राहून निवाडपत्रावर आपली सही करीत असे.

* क) ~~गोतसभा व ग्रामसभा~~ :

१) गोतसभेचे स्वरूप :

मराठेकालीन न्यायव्यवस्थेमधील गोतसभा हे महत्त्वाचे अंग समजले जात असे. मराठेकालीन न्यायव्यवस्थेचे एक खास वैशिष्ट्य म्हणून गोतसभेकडे पाहिले जाते. गोतसभेला शिवकाळात व शाहूच्या काळात मोठेच महत्त्व प्राप्त झाले होते. डॉ. गुणे यांनी गोतसभेचे तीन विभाग सांगितले आहेत. ते विभाग व त्यांची रचना पुढीलप्रमाणे आहे.

१) परगणा गोतसभा :

परगण्यातील एक वजनदार न्यायसंस्था म्हणून या सभेकडे पाहिले जात असे. परगण्यातील गोतसभेत देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, मोकादम, पाटील, नायकवडी, मिरासदार व रयत यांचा समावेश होत असे. परगणा गोतसभेचा मुख्य अधिकारी म्हणजे देशमुख, देशपांडे ही हा देशमुखाला मदत करीत असे. देशमुख

Scanned by CamScanner

व देशपांडे दोघे मिळून परगण्याच्या बाबतीत निर्माण होणारे आर्थिक, न्यायालयीन व सार्वजनिक शांततेची प्रकरणे हाताळीत असत. काहीवेळा दिवाण हा परगणा गोतसभेमार्फत अनेक प्रश्नांचा निकाल लावित असे.

गोतमजलीसचा प्रमुख या नात्याने देशमुखाला दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही स्वरुपाचे खटले चालवावे लागत असत. जमीन महसुलाच्या वसुली संबंधीच्या तक्रारी सोडविणे, परगण्यातील वतनासंबंधीच्या तक्रारी ऐकून घेऊन त्या गोतसभेमार्फत निकालात काढणे ही कामे देशमुखाला करावी लागत असत.

२) कसबा किंवा पेठ गोतसभा :-

कसबा म्हणजे व्यापाराचे ठिकाण, त्यालाच पेठ असे म्हणत. पेठ गोतसभेमध्ये सर्व देशक म्हणजेच देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, नायकवडी, पाटील, कुलकर्णी, चौगुला व बलुतेदार यांचा समावेश असे. कसब्यामधील व्यापारी पेठेचे संरक्षण करण्याचे काम शेटे करीत असे. या शेटेला मदत करण्याचे काम इतर बलुतेदार करीत असत. पेठेतील न्यायविषयक कामे पेठ गोतसभेकडे असत. या गोतसभेमध्ये हजर असणारी माणसे निवाडापत्रावर आपआपल्या खुणा करीत असत. त्यापुढील प्रमाणे महाजन व शेटे - तराजू, सोनार - ऐरण, शिंपी - कात्री, ठाकूर - कट्यार, माळी - मोठी कात्री, जिनगर (सुतार) - करवत, नायकवडी - दंडुका इत्यादी.

३) ग्रामगोतसभा :-

ग्रामगोतसभेत गावचे सर्व वतनदार पाटील, कुलकर्णी, मिरासदार, चौगुले व बारा बलुतेदार, उपरे व आलुतेदार यांचा समावेश होत असे. गावच्या वतनदारांपैकी सर्वात श्रेष्ठ वतनदार म्हणजे मुकादम किंवा पाटील होय. तोच ग्रामगोतसभेचा मुख्य असे. त्याच्या मदतीस कुलकर्णी व चौगुला हे वतनदार असत. हे सर्व वतनदार, बारा बलुतेदार व गावातील इतर प्रतिष्ठित लोक एकत्र बसून प्रशासकीय व न्यायदानविषयक कामे करीत असत. ग्रामगोतसभेने दिलेला निर्णय राजासुद्धा बदलू शकत नसत.

Scanned by CamScanner

एखाद्या निवाडपत्रावर सर्व हजर असणाऱ्या आपआपले शिक्के उमटविले म्हणजे तो न्याय पक्का झाला असे समजले जात असे. बलुतेदारांची संमत चिन्हे पुढीलप्रमाणे होती.

चांभार- आरी, महार- विळा व दोर, कुंभार- चाक, न्हावी- आरसा, मुलाणा - सुरा इत्यादी.

परगणा गोतसभेला अव्वल किंवा प्राथमिक आणि फेरतपासणीचे अधिकार असत. परंतु पेठ व ग्रामगोतसभेला फक्त अव्वल किंवा प्राथमिक न्यायनिवाडयाचे अधिकार असत.

## गोतसभेची संख्या व बैठकीचे स्थान :

गोतसभेत किती सभासद असावेत या संबंधीचा ठराविक नियम नव्हता. गोतसभेची संख्या खटल्याच्या व्याप्तीवरुन ठरविली जात असे.

गोतसभेचा मुख्य गोतसभेची बैठक गावातील एखादया शंकराच्या, गणपतीच्या मंदिरात किंवा नदीच्या किनारी पवित्र ठिकाणी बोलावित असे.

## गोतसभेच्या निर्णयाचा आधार

### धार्मिक ग्रंथ :

गोतसभेच्या न्यायदानाच्या कामात धर्म आणि व्यवहार या दोन बाबी प्रामुख्याने पाहिल्या जात असत. धर्म याचा अर्थ हिंदूचे धार्मिक ग्रंथ, पुराणे, श्रुती, स्मृती यामध्ये दिलेला धर्म होय. व्यवहार म्हणजे प्रचलित पद्धत पाहून सद्सद्विवेकबुद्धीनुसार करावयाचा निर्णय.

मराठेकालीन कायदयांच्या उगम हा प्रामुख्याने पवित्र धर्मग्रंथ हाच असे. धर्मग्रंथाच्या जोडीला व्यवहार मुख्य हा ग्रंथ महत्वाचा मानला जात असे. मनू, हेमाद्री व माधव यांची अवतरणे देऊन एखादा खटला चालविणे ही तर त्यावेळची शिष्टसंमत अशी पद्धत होती. 'यातिनिर्णय' किंवा 'जातिधर्म' या ग्रंथात सर्व जातिसंबंधी ~~केलेली~~ केलेले विविध कायदे असत. जर भिन्न जातीमधील खटला ~~निर्णय~~ निर्माण झाला तर त्यासाठी 'याति निर्णय' या ग्रंथाचा आधार घेतला जात असे.

रुढी व परंपरा :

महध्ययुगात लिखित कायदे अतिशय कमी प्रमाणात अस्तित्वात होते. बहुतेक सर्व कायद्यांचा भर रुढी व परंपरा यांच्यावरच असे. निकाल देताना त्यांचाही आधार निर्णय देताना घेतला जात असे.

गोतसभेचे अधिकार व कार्य :

१) गावागावातील सीमातंटे सोडविणे :

गावागावातील सीमातंटे सोडविण्याचे काम गोतसभेकडून केले जात असे. सीमातंटे सोडविताना सरकारातून अमीन व एक शिपाई या कामाकरिता पंच म्हणून पाठविले जात असत. गावच्या शिवेवर साक्षीदार, शिवेचे नकाशे व इतर पुराव्याची कागदपत्रे हजर ठेवली जात असत. त्यानंतर ग्रामगोतसभेतील भोवतालच्या पाच गावातील पाटील, देशमुख, देशपांडे व कुलकर्णी जमा होऊन दोन्ही गावातील गोतसभेतील सभासद व प्रतिष्ठित लोकांना बोलाविले जाई. नंतर सर्व प्रकरण गोतसभेसमोर ठेवले जाई, सर्व साक्षी पुरावे तपासल्यानंतर दिव्याचा आधार घेतला जात असे. पाटील अगर महार शिवेवर दिव्य करून चालत असत. दिव्यात पाण्याने भरलेली घागर घेऊन चालणे, ओले कातडे घेऊन चालणे किंवा बेलभंडार शिवून चालणे, इत्यादी प्रकार असत. नंतर गोतसभा आपला निर्णय जाहिर करीत असे व हा निर्णय पेशव्यांना कळविला जात असे.

२) कर्जासंबंधीचे कज्जे सोडविणे :

पेशवेकाळात सावकारीचा धंदा अतिशय तेजीत होता. पैसे देण्या घेण्याच्या व्यवहारावरुन बरेच तंटे उद्भवत असत. एखादाने पैसे देण्याचे नाकारल्यावर सावकार त्याच्या दारात आपला माणूस पैसे वसुलीसाठी बसवित असे. अशा प्रक्रियेला 'धरणे' असे म्हणत असत. जर या प्रकरणात कर्जदाराला सावकाराचे पैसे द्यावयाचे नसतील किंवा लांबवायचे असतील तर ग्रामगोतसभेमार्फत या प्रकरणाचा निकाल लावण्याकडे त्याचा कल होत असे. ग्रामगोतसभेकडे

हे प्रकरण आल्यानंतर सर्व साक्षी पुरावे तपासून ही सभा निर्णय देत असे. ग्रामगोतसभेने दिलेला निर्णय हा अशा प्रकरणात अंतिम समजला जात असे.

३) वतनासंबंधीचे खटले चालविणे :

भावाभावातील वतनासंबंधीचे भांडण, कुलकर्णी, देशकुलकर्णी, पाटील, देशमुख, यांच्या वतनासंबंधी निर्माण झालेले झगडे, देवस्थानाच्या वतनासंबंधीचे तंटे हे सर्व गोतसभेमार्फत सोडविले जात असत. काहीवेळा वतनदारमंडळी आपले तंटे गोतसभेपुढे न आणता एकदम पेशव्याकडेच नेत असत. परंतु पेशवे असे खटले पुन्हा गोतसभेकडेच पाठवित असत. मौजे जेजुरी येथील चार भावांचा वतनासंबंधीचा खटला असाच सर्व प्रथम माधवराव पेशव्याकडे गेला असता तो त्यांनी पुन्हा गोतसभेकडे पाठविल्याचा संदर्भ मिळतो.

वतनाच्या दाव्यात वादी व प्रतिवादी यांचे म्हणणे लेखी स्वरुपात घेतले जात असे. साक्षीदारांच्याही लेखी साक्षी घेतल्या जात असत. साक्षीला येण्यापूर्वी साक्षीदाराला एखाद्या मंदिरात अगर कृष्णा, गोदावरी, भिमा अशा पवित्र नद्यांच्या पाण्याने स्नान घातले जाई. दोन्ही पक्ष हजर होवून खटल्यास सुरुवात झाल्यावर जाब जबाब घेतले जात. हे काम सरकारी अधिकारी करीत असे. यानंतर गोतसभेचा मुख्य सर्व पंचांशी विचारविनिमय करून निकालपत्र तयार करीत असे. नंतर त्यावर गोतसभेला हजर असणाऱ्यांची चिन्हे उमटविली जात असत. यानंतर निकालपत्र वाचून दाखविले जात असे. जर हा निकाल वादी किंवा प्रतिवादी यापैकी कोणा एकाला मान्य नसेल तर पेशव्याकडे अपिल केली जात असे.

४) घटस्फोटासंबंधीचे दावे चालविणे :

घटस्फोटासंबंधाचे दावे चालविण्याचे कामही गोतसभेकडून केले जात असावे असे पेशवेकालीन कागदपत्रावरुन दिसते. उदा. नाईकबाई जगताप ही आपला पती राणोजी जगताप याच्यापासून घटस्फोट घेऊ इच्छित होती. तिने सरकारी दिवाण

Scanned by CamScanner

व ग्रामगोतसभेशी संपर्क साधून गोतसभेची बैठक बोलविण्याची विनंती केली. या विनंतीवरुन ग्रामगोतसभेची बैठक सिद्धेश्वराच्या मंदिरात भरविली गेल्याचा संदर्भ मिळतो.

५) सामाजिक व धार्मिक संघर्षाचे खटले चालविणे :

सामाजिक व धार्मिक स्वरूपाचे संघर्षही गोतसभेकडे येत असत. सासवडला बोलविण्यात आलेल्या गोतसभेकडे जातिबहिष्काराच्या एक खटला आल्याचा संदर्भ तत्कालीन कागदपत्रात मिळतो. संताजी मोटे याला त्याने जातीची बंधने तोडल्याबद्दल जातिबहिष्कृत करण्यात आले होते. त्याला कोणीही पंगतीला घेत नव्हते. संताजी याने केलेल्या विनंतीवरुन सासवडला गणपतीच्या मंदिरात गोतसभेची बैठक बोलविण्यात आली. या बैठकीला पुण्यातील कसबा पेठ, सुपे, चाकण, तळेगाव, वाघोली, नांदेड, बारामती येथील शेटे, महाजन, देशमुख, देशपांडे पाटील व कुलकर्णी या वतनदारांना बोलविण्यात आले होते. या गोतसभेने ~~संभा~~ संताजी मोटे याला काही प्रायश्चित्त सांगून त्याला शुद्ध करून घेतले. त्यानंतर त्याच्यावरील बहिष्कार उठविण्यात आला. या उदाहरणावरुन गोतसभेच्या कामाचे स्वरुप आपल्या लक्षात येते.

६) दत्तकविधानासंबंधीचे गोतसभेचे अधिकार :

एखादी निपुत्रिक स्त्री पती निधनानंतर स्वगोत्रातील एखादया मुलाला दत्तक घेऊ शकत असे. परंतु स्वगोत्रातील मुलगा मिळालाच नाही तर परगोत्रातील मुलगा दत्तक घेता येत असे. मात्र कोणत्याही परिस्थितीत असे दत्तकविधान गोतसभेने मंजूर केल्याशिवाय कायदेशीर ठरत नसे. गोतसभेच्या मंजुरीनंतर सरकारातून दत्तकविधानाची सनद मिळत असे.

Scanned by CamScanner

क) दिव्य :

पेशवेकाळात साक्षीपुराव्याच्या जोडीलाच दिव्य या प्रकारालासुद्धा तिक तितकेच महत्त्व असल्याचे दिसून येते. जे काम साक्षी पुराव्याने साधत नसे ते काम करण्यासाठी दिव्याचा आधार घ्यावा लागत असे. काही वेळेला जर साक्षीपुरावा ग्राह्य मानला गेला किंवा दोन्ही बाजूचे लोक जर न्यायदानाच्या पद्धतीबद्दल असमाधानी असतील तर एक पर्याय म्हणून दिव्य केले जाई. ज्या ठिकाणी केले जाई तेथील अधिकाऱ्याला पंचायत एक पत्र देत असे. दिव्य त्या ठिकाणी झाल्यानंतर तो अधिकारी दिव्य झाल्याचे पत्र पंचायतीला देई. त्याला 'थळपत्र' असे म्हटले जाई. या थळपत्रावरुनच संबंधित खटल्यामध्ये महजर लिहला जात असे. उकळत्या तेलातून लोखंडाचा तुकडा हाताने बाहेर काढणे किंवा लोखंडाचा तप्त गोळा हातात घेऊन सात प्रदक्षिणा देवळाभोवती घालणे नदीच्या पात्रात उतरुन पाणी हातात घेऊन शपथ घेणे, भाकरी, फुले, अंगारा, बेल हातात घेऊन शपथ घेणे इ. दिव्याचे प्रकार पेशवेकाळात उपलब्ध होते.

Scanned by CamScanner